**प्रेसनोट दि.०५/०३/२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**कोबिंग ऑपरेशन दरम्यान सिंहगडरोड पोलीसांची कामगिरी**

---

दि. ०४/०३/२०१९ रोजी **वरिष्ठांचे आदेशाने रात्रौ** ००:०० **वा नंतर** सिंहगडरोड पोलीस ठाणे अंकीत **वडगाव बु॥. मधील तुकाईनगर येथे कोबिंग ऑपरेशन करीता पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री पवार साहेब, पोलीस उप निरीक्षक सोनावणे व पोलीस स्टेशनची पुर्ण डि बी टिम यांचेसह कोंबिग ऑपरेशन सुरु केले होते. तुकाईनगर हद्दीतील सर्व गुन्हेगार चेक केले. त्यानंतर अंदाजे** ०२:३० **वा दरम्यान समर्थनगर येथे अंधारात एक इसम उभा असलेला रफिक लतिफ नदाफ,पोलीस शिपाई/**८४५४ **नेमणुक सिहंगड रोड पोलीस स्टेशन ,पुणे शहर** यांना **दिसला,** त्यामुळे त्यांनी त्यांचे सोबत असलेले **पोलीस शिपाई/** ८८९७ **योगेश जालिंदर झेंडे** यांना सदर इसमाबाबत माहीती देवुन **त्या उभ्या असलेल्या इसमाकडे गे ले असता तो तेथून पळून जावू लागला असता** त्यांनी **दोघांनी त्याचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेवून त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने उडवा उडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेला एक कोयता मिळून आला. त्याला सदर लोख डी कोयत्यासह ताब्यात घेवुन वडगाव चौकी येथे आणले असता त्याचेकडे विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव पराग राजेंद्र भुवड ,वय** २८ **वर्षे, रा.समर्थ नगर हिंगणे खुर्द ,सिंहगड रोड असे सांगितले. त्याचेकडे एक लोखंडी कोयता त्याला लाकडी मुठ असलेला त्याचे पाते** २ **इंचाचे व लांबी** ११.५ **इंच पुढील बाजूस निमुळता बाक असलेला अशा वर्णनाचा कोयता सदर व्यक्ती कोणतेही कारण नसताना स्वत:जवळ बाळगताना मिळून आ**ल्याने सदर **इसम नामे पराग राजेंद्र भुवड, वय** २८ **वर्षे,रा.समर्थ नगर हिंगणे खुर्द ,सिंहगड रोड यांनी मा.सह पोलीस आयुक्त पुणे शहर यांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केले असुन त्यांनी मु.पो.का कलम** ३७(१)(३),१३५ **व आर्म अक्ट कलम** ४ **सह** २५ **प्रमाणे हत्यार जवळ बाळगणे कायदयाने गुन्हा असताना स्वत:जवळ लोखंडी कोयता हे धारदार हत्यार बाळगले आहे. म्हणुन रफिक लतिफ नदाफ ,पोलीस शिपाई/** ८४५४ **नेमणुक सिहंगड रोड पोलीस स्टेशन ,पुणे शहर** यांनी कायदेशीर तक्रार दिल्याने सिंहगडरोड पो.स्टे. गुन्हा रजि. नं. २०२/२०१९ **मु.पो.का कलम** ३७(१)(३),१३५ **व आर्म अक्ट कलम** ४ **सह** २५ अन्वये गुन्हा दाखल करुन त्यास दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.